# चकण्या पोपटाची डोळस फिल्मी ट्रॅजिडी

प्रल्हाद जाधव

***

पोपट म्हणतो,'मी आत्महत्या केली नाही.'
अंजू म्हणते,'मी त्याचा खून केला नाही...'

*
प्रत्येक माणसाच्या आयुष्यात एक अंजू आणि प्रत्येक अंजूच्या स्वप्नात एक पोपट असतो.

*
पोपट मेला यावर लोकांचा विश्वास बसत नाही; अंजूचा तर मुळीच नाही. आपण अजून जिवंत आहोत असे कधी कधी खुद्द पोपटलासुद्धा वाटते!

*
फ्रेममध्ये निळ्याभोर आभाळाचा तुकडा. कॅमेरा हळूहळू क्षितीजावर येतो. तेथे चार-दोन वांझ ढग. त्यातून उगवत्या सूर्याचे फाकलेले किरण.

झूम-इन्. ढगांचा क्लोजप्.कॅमेरा टिल्ट होत खाली येतो.वेगाने पूलबॅक.

कॅमेरा पाठ वळवतो तेव्हा फ्रेममध्ये मेलेला पोपट... पोपटचे डोळे उघडेच आहेत. त्याचा तिरळा डोळा उठून दिसतो त्या डोळ्याचा एक्स्ट्रीम क्लोजप्.

***

अंजूच्या घरासमोर पोपट मरून पडला होता. त्याचे शरीर लाकडासारखे ताठ झाले होते. त्याच्या चड्डीची नाडी सुटली होती. तोंड विचकलेले होते. ओठावरून लाळेचा एक ओघळ कानशिलापर्यंत येऊन तसाच वाळला होता. त्यावर माशा घोंघावत होत्या. एक माशी पोपटच्या खोलगट बेंबीवर गोलगोल राणी खेळत होती.

पोपटच्या मुडद्याभोवती माणसांचा घोळका जमला होता. लहान-मोठी पोरं, बायका, मोठी माणसं वेगवेगळे गट करून लांबूनच त्याच्याकडे पहात होती. कुजबुजत होती. काहीजण पोपटला मढ्या मारूती समजून नमस्कारही करीत होते. सायकली, ट्रक्स, टेंपो, बसगाड्या त्याच्या बाजूने भराभर निघून जात होत्या. पोपटच्या मढ्यावर धुळीचा थर वाढत होता. पण एकही माणूस असा पुढे झाला नाही की ज्याने पुढे येऊन सिनेमात जसे मृताचे डोळे मिटवतात, अंगावर कफन ओढतात आणि छातीवर डोके टेकून हंबरडा फोडतात तसे केले!

पोपटचे डोळे कसलातरी शोध घेत असल्यासारखे उघडे राहिले होते. त्याचा तिरळा डोळा विशेष उठून दिसत होता. ज्या एका डोळ्याने त्याला आयुष्यभर गैरसमजाचा धनी केले त्या डोळ्याने मृत्यूनंतरही पोपटची पाठ सोडली नव्हती. ह्या डोळ्यानेच पुन्हा घोटाळा केला आणि पोपट मेलेला असला तरी त्याला बंगल्यातून बाहेर पडणारी अंजू दिसली.

समोरून मंद मंद पावलं टाकीत अंजू येत होती. तिचा मूळचा गौरवर्ण रात्रीच्या जागरणामुळं तांबूस झालेला होता. बारीक नक्षीच्या फुलांची साडी आणि तसलंच ब्लाऊज. रंग कोणता होता हे नेमकं सांगता येत नव्हतं पण तो तिला खुलून दिसत होता. तोंडाला मेकप् करण्यासारखी अंजूची परिस्थिती नव्हती कारण ती मूळातच सुंदर होती. टपोरे पाणीदार डोळे, मूळच्याच रेखीव असणाऱ्या भुवया आणि चेहऱ्यावरची नैसर्गिक टवटवी! अपवादात्मक कमनीय बांधा हे तिचं खास वैशिष्ट्य होतं. ते इतकं पराकोटीचं होतं की तिला पाहून मेलेला मुडदा उठून बसला तर त्यात आश्चर्य ते काय?

पोपट जिथे मरून पडला होता तिथवर अंजू येऊन पोहोचली. पोपटच्या मुडद्याशी क्षणभर थांबून तिने त्याच्याकडे आपादमस्तक पाहिलं...

पोपटचा तिरळा डोळा गर्रकन फिरला. त्यानं किंचितशी हालचाल केली आणि मग तो उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला. त्याच्या या हालचाली पाहून अवतीभोवती उभे असणाऱ्या माणसांची बोबडी वळली! अंजूच्या चेहऱ्यावर मात्र स्मीत उमटले होते.

इतक्यात कचाक्कन ब्रेक्स दाबल्याचा आवाज आला. बंगल्यातून एक पांढरीशुभ्र फियाट वेगाने बाहेर आली आणि अंजूजवळ लाचार कुत्र्यासारखी उभी राहिली. अंजूने पट्कन दरवाजा उघडला आणि ती आत बसली. पाहता पाहता गाडी सुसाट वेगानं निघून गेली. गाडीच्या काचा काळ्या असल्यामुळं गाडी कोण चालवतंय हे पोपटला दिसलं नाही.

अंजूचा पाठलाग करावा अशी प्रबळ इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. पण त्याच्याकडे वाहन नव्हते. या क्षणी त्याला आपल्या आवडत्या घोड्याची आठवण झाली. भरगच्च सोनेरी आयाळीचा पांढराशुभ्र घोडा. त्या घोड्यावर बसून पोपटने नको नको तिथे जाण्याचा विक्रम केला होता. आज तो पंचकल्याणी वारू त्याच्याजवळ असता तर त्याने अंजूची गाडी सहज मागे टाकली असती.

घोड्याच्या आठवणीने त्याला उगाच भरून आले. अपराधीपणाची भावना त्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसू लागली. पौर्णिमेच्या एका पिठूर चांदण्या रात्री त्याने आपल्या घोड्याला फेसाळत्या  समुद्रकिनाऱ्यावर पिस्तुलाची गोळी घालून ठार केले होते.

***

'देगा उसका भी भला
न देगा उसकाभी भला'
एक फकीर सस्मीतमुखाने पोपटसमोर उभा होता. त्याने खाली वाकून, आधार देऊन पोपटला उठवले आणि बसते केले. पोपट म्हणाला,

"तुम्हाला कुठंतरी पाहिलंय"
"मी सर्वत्र भरून राहिलेला नाही"
फकीर फक्त हसला.
"मी आपल्याला वंदन करतो"
"अकल्याणमस्तू!"

असे म्हणून फकीर पुन्हा हसला. त्याचे हसणे इतके दिव्य होते की त्याचे शिष्यत्व पत्करावे असे पोपटला वाटले. तो फकिराला म्हणाला,
"बाबा मला ज्ञान द्या"
फकिराने पुन्हा स्मीत केले आणि तो म्हणाला,
"मी आयुष्यात पहिल्यांदा दारू पिऊन जिच्यावर ओकलो ती फरशी अल्कोहोलमुळं अद्याप पांढरी दिसते. त्या फरशीची पूजा कर ती तुला ज्ञान देईल."
"ज्ञान मिळवणं इतकं सोपं असतं?"
"ज्ञान मिळवणं अतिशय सोपं असतं पण अज्ञान मिळवणं हे अधिक कठीण असतं आणि म्हणून आपण नेहमी अज्ञानाचा शोध घ्यावा."
"मग मला अज्ञान द्या बाबा, अडाणी करा!"
पोपटने अशी याचना करताच फकीर म्हणाला,
"माझ्या मागून येऊ नको. तिच्या मागून जा."
असे म्हणून फकिराने अंजू जिकडे गेली होती तिकडे हात केला.
पोपटचे डोळे - विशेषत: त्याचा तिरळा डोळा विलक्षण तेजाने तळपू लागला. साक्षात्कार झाल्यासारखा तो फकिराच्या पायावर पडला.

फकिराने त्याला वर उठवले. झोळीतून एक चिलिम काढून भरली. काथ्याची गुंडी पेटवून तीचिलमीवर दाबली आणि पहिला झुरका मारण्याचा मान पोपटला दिला.पोपटने एक प्राणंतिक झुरका घेतला. गांजातून बाहेर पडलेला तलम, निळा, जिवंत झोंबरा धूर त्याच्या फफ्फुसातील वायुकोशांपर्यंत पोहोचला. तेथून एक तरल, पारलौकिक संदेश रक्तवाहिन्यांतून त्याच्या अंगभर पसरत गेला...
पोपटच्या डोळ्यासमोर आता अनेक विस्मयकारक असे प्राणी, पक्षी, वनस्पती आणि विविध प्रकारचे, विविध रंगांचे अगम्य आकार लयीत साकार होऊ लागले. विशाल चांदण्या रात्रीतील आकाशासारख्या त्याच्या मनावर अंजूचा त्रिमिती चेहरा झूम होत पुढे आला आणि त्याचा एक्स्ट्रीम क्लोजअप एका फ्लॅट चतकोर तुकड्यात परिवर्तीत होऊन फ्रेमच्या बाहेर निघून गेला.

अंजूच्या चेहेऱ्याचे गोल, चौकोनी, त्रिकोणी, अष्टकोनी तुकडे भराभर त्याच्या डोळ्यासामोर येऊन नाहिसे व्हायला लागले. मध्येच तिच्या चेहेऱ्याचा एक चौकोन चारीही अंगाने आतल्या बाजूला गुंडाळी होत गेला.

तिचा चेहेरा आता चेंडूसारखा पूर्णपणे गोल झाला आणि स्वत:भोवती फिरत फिरत अतिवेगाने त्याच्या मनाच्या एका अंधाऱ्या विवरामध्ये खेचल्यासारखा नाहीसा झाला...

“अंजू!” म्हणून पोपट जेव्हा किंचाळला तेव्हा त्याच्या खांद्यावर फकिराचा हात होता.
“बाबा, मला अज्ञान द्या.”
पोपटने फकिराची पुन्हा विनवणी केली. तेव्हा फकिराने पुन्हा अंजू गेली होती त्या दिशेला बोट केले आणि पोपट भारावल्यासारखा त्या दिशेला चालू लागला...

***
एका भव्य हॉटेलचा लाँगशॉट गिळत गिळत कॅमेरा एका प्रकाशमान खिडकीतून खाली उतरला. आतल्या भल्यामोठ्या हॉलमध्ये अनेक टेबलं सजवून ठेवलेली होती. त्यांच्या बाजूने विविध प्रकारचे पुरूष विविध प्रकारच्या बायकांना घेऊन बसलेले होते आणि विविध प्रकारची दारू पीत होते. एका कोपऱ्यात एक छोटासा रंगमंच होता. त्यावर मानवी कातडी नेसलेल्या काही माद्या नृत्य करीत होत्या. त्यांच्या अंगावर विविध रंगांची द्रूत प्रकाशयोजना केली जात होती आणि तिला साजेसे द्रूत संगीत दिले जात होते.

ह्या चित्रातला एक ओघळ सरकत सरकत जिथे आला तिथे अंजू बसली होती. तिच्यासमोर बसलेला माणूस बहुदा तिचा नवरा असावा. भान हरपून तो पीत होता! तिच्यासमोर जिनचा चषक होता. त्यात पडलेली लिंबाची पातळ गोल चकती तिने उचलली आणि जिभेवर ठेवली.

पोपटला आठवलं. अंजूला आंबट पदार्थ फार आवडायचे. ती म्हणायची, “आंबट पदार्थात सायट्रिकॲसीड असतं त्यामुळे पचनशक्ती सुधारते!”.तिच्या या हुषारीमुळे शाळेत तिचा नेहमी पहिला नंबर असायचा.

एकदा एका फॅमिली रूममध्ये अंजूने पोपटचे एक चुंबन घेतले. पण ते ओझरते आणि पुसट होते त्यामुळे तिने आपली आणखी एक चुंबन घ्यावे अशी अपेक्षा पोपटने व्यक्त केली पण अंजू ऐकत नव्हती. अखेर पोपट म्हणाला की, “चुंबन आंबट असतं!” आणि त्यावर अंजूनं पोपटचं एक प्रदीर्घ चुंबन घेतलं होतं.

पोपटच्या तिरळ्या डोळ्यामुळे त्याच्या मनात खोलवर कुठेतरी एक न्यूनगंड निर्माण झाला होता. आपण दिसायला फार बेंगरूळ आहोत त्यामुळे आपल्याशी बोलणं मुलींना अपमानास्पद वाटत असावं असं त्याचं मत होतं. त्यामुळेच अंजूला आपण आवडतो यावर त्याचा विश्वास बसत नसे. एकदा त्यानं अंजूला विचारलं,

“अंजू”
“हूं...”

माझा एक डोळा तिरळा आहे म्हणून मी तुला आवडत नाही काय?

“छे...छे... आवडण्याचा आणि डोळ्याचा काय संबंध? पण तुझ्या त्या डोळ्याची एक विलक्षण भीतीमात्र मला वाटत असते.”
“का ?” पोपटने विचारले.
“कारण जेव्हा मी आणि माझी एखादी मैत्रीण अशा दोघींशी तू बोलत असतोस तेव्हा नेमका कुणाशी बोलतोस याचा मला संभ्रम पडतो. तुझा एक डोळा तिच्यावर आणि एक डोळा माझ्यावर रोखलेला असतो आणि मग मला असं वाटतं की तू तिच्यासाठीच सारंकाही करतोहेस!”

हे ऐकून पोपट भयंकर अस्वस्थ झाला. आपल्या तिरळ्या डोळ्यामुळे अंजूची अशी अडचण होत असेल हे त्याच्या कधी लक्षातच आलं नव्हतं.

मग पोपटने अंजूची पर्स उघडली. ती पर्समध्ये नेहमी नेलकटर ठेवायची. पोपटने ते नेल कटर काढले. त्यातली सुरी फिरवून बाहेर काढली आणि कच्कन आपल्या तिरळ्या डोळ्यात खुपसली. फळातून कोरून गर बाहेर काढावा त्याप्रमाणे त्याने खोबणीतून अख्खा डोळा, बाहेर काढला आणि अंजूला म्हणाला,

“घे!”

पोपटच्या डोळ्यातून रक्ताची धार लागली होती. रक्ताचे काही ओघळत्याच्या गालावरून, मानेवरून शर्टावर पसरले होते. पण त्याच्या चेहऱ्यावर मात्र एक प्रकारचे दिव्य हासू होते. अंजूने पोपटचा डोळा आपल्या हातात घेतला आणि ती म्हणाली,

“पोपट, पुरूषाचे सौंदर्य हे त्याच्या रूपावर अवलंबून नसून त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून असतं”.

अंजू शाळेत असताना रोज फळ्यावर सुविचार लिहायची, त्याची आठवण पोपटला झाली. त्या आठवणीत हरवलेला असतानाच अंजूने त्याच्या डोळा होता तसा परत लावून दिला...

त्या डोळ्यानं पोपटला आयुष्यात पुन्हा कधीही पूर्वीसारखं दिसलं नाही...

***

एकदा पोपटला घेऊन अंजू रेकॉर्डिंगसाठी गेली होती. लिफ्टमध्ये फक्त अंजू आणि पोपट. अशात लिफ्ट मध्येच बंद पडली. त्याक्षणी अंजूने पोपटला आवेगाने कवळले. तिच्या त्या स्पर्शामुळे तिच्या मनातील संदेश पोपटच्या काळजापर्यंत पोहोचला.तेव्हा पोपटला प्रथमच समजले की शरीरावरची कातडी फक्त उष्णतेचं नियमन करण्यासाठी नसते तर तिच्या आत पेटलेल्या गुलमोहोराचे अनेक मोसमही दडलेले असतात!

अंजूने पोपटवरची आपली पकड अधिक घट्ट केली आणि त्याला विचारले,
“पोपट, सत्य कसे असते रे ?”
तेव्हा पोपट म्हणाला,
“सत्य हे कंचुकीतल्या स्तनासारखं गोलं, गरगरीत, उबदार, मऊ-मुलायम, हवंहवंस, नकोनकोसं, अपेक्षेपेक्षा मोठं किंवा लहान, गुलाबी, गोरं, तांबुस गव्हाळ वर्णाचं, गोड-कडू, दिसणारं-न दिसणारं असं असून असत्यानं भोग घेतल्यावर त्याला पान्हा फुटतो.”

त्या क्षणानं विंगेच्या आडून प्रॉम्पटरची भूमिका बजावली आणि पोपटने आपला संवाद चोख म्हटला. तोवर लिफ्ट सुरू झाली होती...

***

पोपट हॉटेलच्या गेटजवळ उभा होता. त्याला वर हॉलमध्ये जाऊन अंजूला भेटायचं होतं पण चौकीदार त्याला आत सोडत नव्हता. शेवटी कंटाळून पोपट शेजारच्या पानपट्टीवर गेला. तेथून त्याने एक सिगारेट घेतली आणि ती शिलगावून त्या पानपट्टीवाल्याला विचारले,
“आतमध्ये ती पार्टी चाललेय ती कधी संपेल?”
त्यावर पानपट्टीवाला म्हणाला,
“पार्टी सुरू होण्याची वेळ ठरलेली असते संपण्याची नसते.”

पानपट्टीवाल्याला जो व्यवहार समजतो तो पोपटला कधीच समजला नाही त्यामुळे तो आयुष्यभर अपयशी होत राहिला, जखमी होत राहिला, घायाळ होत राहिला, तडफडत राहिला, शोध घेत राहिला, जीव लावीत राहिला, बदनाम होत राहिला...

अंजूच्या प्रकरणात त्याची खूप बदनामी झाली होती. खरेतर आभाळात ढग आल्यावर मोराला नाचावसं वाटतं त्याप्रमाणे अंजू समोर आली की तो तिच्याकडे आकृष्ट व्हायचा मग ती कुठेही असो, कधीही असो, कशीही असो. पण हे लोकांना कधीच समजलं नाही कारण ते मूर्ख अथवा पण परंतु किंवा गांडू होते.

पोपटने सिगारेटचा एक दीर्घ झुरका घेतला. पानपट्टीच्या शेजारी एक चिंचेचे झाड होते. त्याच्या तळाशी तो पाठ टेकून बसला. हॉटेलातली ती प्रकाशमान खिडकी आता रात्रीच्या अंधारात अधिक उठून दिसत होती. अंजूच्या डोक्यात एव्हाना जीनची नशा चांगलीच भिनली असेल असे त्याला वाटले. पार्टी संपेपर्यंत टाईमपास करायला हवा होता म्हणून अंजू जर अस्तित्वातच नसती तर काय झाले असते या विषयावर पोपट विचार करू लागला...

***

एका भव्य रूग्णालयाच्या इमारतीतून पोपट आत शिरला तेव्हा पायाच्या नखापासून डोक्याच्या केसापर्यंत बँडेजमध्ये गुंडाळलेला एक मृतदेह स्ट्रेचरवर घालून बाहेर आणला जात होता. पोपटच्या काळजात चर्रऽऽऽ झाले. ही अंजू नसेल ना? एका विलक्षण आवेगाने तो धावत त्या देहाजवळ गेला. त्याच्या गळ्यात एक लेबल अडकवलेले होते.खाली वाकून त्यावरची माहिती त्याने वाचली :

‘अनआयडेंटीफाईड–
मेल,
फॉर्टी टू इयर्स,
मुस्लीम.’

स्ट्रेचर पुढे सरकले आणि पोपट अंजूच्या खोलीकडे चालू लागला त्याच्या मनात विचार आला की ‘हा माणूस’ बेवारशासारखा मेला पण तो खरेच बेवारस असेल काय? त्याला आई-बाप, भाऊ-बहिण, मित्र, मैत्रिण, बायको, पोरं, हितचिंतक, हितशूत्रू, त्याचा एखादा पाळलेला कुत्रा, पोपट, गाय, बैल, घोडा किंवा घरात घरटं करून राहणाऱ्या चिमण्यासुद्धा नसतील?

पोपट स्वत:शीच हसला. चालता चालता अगदी सहजगत्या त्याचा उजवा हात पँटीच्या खिशात गेला. खिसा आतून फाटला होता. त्यातून चालून चालून फुगलेली मांडीवरची शीर त्याच्या बोटाला लागली. तिच्यावर बोट दाबून त्याने आतील रक्तप्रवाह क्षणभर बंद केला.

पोपटला दोनवेळचे पोटभर जेवणही मिळायची भ्रांत होती. तो अस्वस्थपणे फिरत राहायचा. कधी वडा-पाव, कधी केळी, कधी मिसळ. उंचचउंच इमारतीतून वरखाली फिरायचा. लांबरूंद रस्त्यावरून मागेपुढे व्हायचा. विविध प्रकारच्या उद्यानातून ह्या कुशीवरून त्या कुशीवर जागत रहायचा. त्यात साली ही अंजू !

मांडीवरची शीर पोपटने बोट उचलून मोकळी केली आणि त्याच बोटाने त्याने अंजूच्या दारावर टक् टक् केले.

“येस?”
“मी आहे...”
“कम् इन”

पोपट आत गेला. आत अंजूचे एक नोकरीदार नातेवाईक बसले होते. नोकरीवर जायची वेळ झाल्यामुळं त्यांनी अंजूचा निरोप घेतला आणि ते चालते झाले.

'ये बैस!'

हॉस्पिटलच्या  ढगळ पिवळट गणवेशात अंजू झाकून गेली होती. पोपटला वाटले हिला अशीच धरून हलवली तर वाळलेल्या शेंगेतील बी सारखा तिचा खुळखुळ् आवाज येईल. उशी पाठीशी घेऊन ती कॉटवर बसली होती. तिच्या मागच्या बाजूची मोठी खिडकी सताड उघडी होती. खिडकीच्या बाहेर आगीसारख्या पेटलेल्या गुलमोहोराची फांदी संथपणे झुलत होती. वर निळ्या आकाशाचा खोल तुकडा. त्यात एक चुकार वांझ ढग...

'अरे बैस ना'
पोपट बसला.

"पोपट?"
"काय?"
"मी यातून जगणार नाही."
"तसं जगण्यापेक्षा मरणं चांगलं"
"मी मरावं असं वाटतं तुला?"
"गर्भाशयाची पिशवी काढून टाकल्यानंतर जगण्यासारखं तुझ्यात काय राहिलं?"
"का ? वांझ बायका जगत नाहीत?"
"आपण कधीतरी आई होऊ या आशेवर त्या जगत असतात. जख्ख म्हाताऱ्या झाल्या तरी! त्यांना आपल्या गर्भाशयाचा अतोनात गर्व असतो. तीच त्यांच्या जगण्याची प्रेरणा असते."
"तरीही मला जगायचंय"
"का? कशासाठी?"

अंजू निरूत्तर झाली. पोपटने तिचा हात हातात घेत म्हटलं,
"तू मर, मी तुझ्या आयुष्याला अर्थ देतो."
"तू फार क्रूर आहेस..."
"तुला तसं का वाटतं?ऑपरेशननंतर तुझ्या जगण्याला काय अर्थ असणार आहे?'
"तुझं मत माझ्यावर लादतोहेस तू!"
"माझं मत तुझं मत नाही? तुझा श्वास माझा श्वास नाही? माझं काळीज तुझं काळीज नाही? तू मी नाहीस?"

"तू हुकूमशहा आहेस!"

पोपटची नजर बाहेरच्या गुलमोहोराच्या फांदीवर गेली. गुलमोहराच्या एका लालभडक घोसावरून एक हिरवाजर्द पक्षी उडाला आणि आभाळाच्या निळ्याभोर तुकड्यात विरघळून गेला.

दार उघडून नर्स आत आली. तिने अंजूचे टेंपरेचर घेतले. गोळ्या दिल्या. इंजेक्शन भरले आणि तिच्या दंडात खुपसले. त्या क्षणाची अँब्युलन्स पोपटच्या एका रक्तवाहिनीतून सुसाट गतीने मेंदूकडे पळू लागली...

***

लो अँगल शॉट. फ्रेमभर हिरवा मास्क. त्यावरून टिल्ट होत कॅमेरा डॉक्टरच्या चष्म्यावर येतो. चष्म्याच्या जाड काचेखालील डोळ्याचा एक्स्ट्रीम क्लोजप्. कॅमेरा पूलबॅक आणि नंतर 'लो अँगलने'च तो डॉक्टरांचे विकृत चेहेरे दाखवत झुलत राहतो.

अल्ट्राव्हायोलेट लँपखाली, ऑपरेशन टेबलवर अंजूचा संगमवरी चेहेरा. नर्सेसची पळापळ. कात्री-सुऱ्यांची किणकिण. घड्याळाची टिकटिक. ब्लेडच्या पाठोपाठ उमटत गेलेली रक्ताची भडक रेघ. रक्ताळलेले ग्लोव्हज्. सर्जिकल कॉटन. अस्फूट वेदना. तळमळ. वहीतील शेवटच्या पानावरची कविता. रक्ताळलेले ग्लोव्हज्. धपापणारे मांस, अस्थिर कार्डिओग्रॅमची जीवघेणी बिप-बिप. चौपाटीवरची भेळ. चिंताग्रस्त चेहेरे. होडीतील जग. ऑक्सिजन. जॅझ. डान्सिंग क्लब. डब्यातील पोळीभाजी. काळजाची लपलप. वारा. पाऊस. विजा. वेदना. अर्धचंद्राकृती सुया. मुर्दाड टाके, जळते निखारे, स्पप्नदोष बकुळीची फुलं...

फुलं...फुलं...फुलं...

वाऱ्याच्या हळूवार झुळूकीमुळे अंजूच्या पाठीमागील खिडकी बंद व्हायला निघाली होती, तेवढ्यात बाहेरून झपकन एक गिधाड आत आले आणि अंजूचे गर्भाशय घेऊन क्षणार्धात नाहीसे झाले.

"अंजू...अंजू..."

पोपटने आकांताने हाक मारली. एका नर्सने पोपटला दटावले.
"त्यांना विश्रांतीची गरज आहे. प्लीज लीव्ह हर अलोन"
तिने पोपटला बाहेरचे दार दाखवले.

पोपटने नर्सकडे रोखून पाहिले. तिचे पुष्ट स्तन ठळकपणे नजरेत भरत होते. तिच्या सिस्टर ह्या हुद्याशी ती विसंगत दिसत होती.

***

आठवणीत हरवलेला पोपट अकस्मात उठून उभा राहिला. अंजू हॉटेलच्या बाहेर पडत होती. तिच्या शेजारी बसलेला तो बलदंड माणूस आता पूर्णपणे झिंगला होता आणि अंजूच्या खांद्यांचा आधार घेऊन चालत होता. त्याचे पाय लटपटत होते. त्याला पाहून चंद्राला गिळणाऱ्या राहूची आठवण पोपटला झाली.

हॉटेलच्या पायऱ्या उतरून ते दोघेही खाली आले. तिथे पोपट उभा होता.

"हॅलो पोपट"
"हॅलो... तू मला ओळखलंस?"
"तू इथे येणार हे सुद्धा मला माहीत होतं !"

अंजू असं म्हणतेय तोवर तिच्यासोबत असणाऱ्या त्या केसाळ काळ्या रानडुकरासारख्या माणसानं डोळे किलकिले करून तिच्याकडे पाहिलं.
"मी ओळख करून देते, "हे माझे मिस्टर! आणि हा पोपट."
"पोपट?" असे म्हणून तो माणूस विकट हसला. आपला चरबीदार हात पुढे करून त्याने पोपटचा हात आपल्या हातात घेतला आणि "हाऊ डू यू डू" केलं.

त्याच्या हाताच्या त्या मऊ, ओलसर थंडगार स्पर्शानं पोपट क्षणभर अस्वस्थ झाला. त्या रानदांडग्या माणसाचा स्पर्श आपला इतका अपेक्षाभंग करील असं त्याला वाटलं नव्हतं. पोपटनेही “हाऊ डू यू डू” करत त्याचा हात वर उचलला. त्याच्या बोटातील अंगठीतील हिऱ्याची चमक पोपटच्या नजरेत पात्यासारखी घुसली.

“कमॉन पोपट, डू यू वॉन्ट टू ड्रिंक?”

अंजूच्या नवऱ्याने पोपटला पिण्याची ऑफर दिली. पण तोवर त्याला स्वत:ला सांभाळण्याइतकंही भान राहिलेलं नव्हतं. तो बेहोश होऊन पोपटच्या अंगावर कोसळला. त्याला सावरत पोपटने अंजूकडे पाहिले. ती निर्विकारपणे गाडीकडे चालायला लागली होती. मग पोपटने त्या माणसाचे धूड ओढत ओढत गाडीपाशी आणले. अंजूने मागचा दरवाजा उघडला, पोपटने त्या माणसाला आत टाकले. मागचा दरवाजा बंद करून ती पुढे आली आणि पोपटच्या हातात चावी देऊन ती त्याच्या शेजारी बसली. पोपेटने निमूटपणे गाडी न्यूट्रल केली आणि क्लच दाबून गिअर्स बदलत सुसाट सोडली.

“पोपट...”
“बोल अंजू!”
“तुझ्या मनात आलं तर तू आता गाडीचा ॲक्सिडेंट करू शकशील...”
“तुझ्या मनात तसं का यावं?”
“मी मरावं अशी तुझी इच्छा होती!”
“तू जिवंत आहेस हा तुझा भ्रम आहे.”
“म्हणजे?”
“जिवंत आहे ती तुझी वासना’
“काय म्हणायचंय तुला?’
“बिनसुरांची बासरी आहेस तू. नुसतेच एक पोकळ नळकांडे!”

“मला तुझ्याशी वाद घालायचा नाही.”
“मी फक्त तुझ्या प्रश्नांची उत्तरं देतोय...”
“प्रश्न का विचारत नाहीस?”
“तुला कोणता प्रश्न अपेक्षित आहे?”
“मी तुझ्याशी लग्न का केलं नाही असा प्रश्न कधीच विचारावासं वाटलं नाही?”
“त्याचं उत्तर मला माहीत आहे.”
“काय?”
“तू माझ्यावर प्रेम करतेस”
“पोपट आय लव्ह यू!”
“टुकार हिंदी सिनेमातल्यासारखं असत्य!”
“मग सत्य आहे तरी काय?”
“स्टिअरिंग व्हील, रस्ता आणि स्पीडब्रेकर्स हे जगातलं अंतिम सत्य आहे.”

पोपट मनसोक्तपणे हसला. एक छोटंसं वळण घेऊन त्यानं गाडी बंगल्याच्या पोर्चमध्ये आणली आणि हळूवारपणे उभी केली. खाली उतरून अंजूच्या नवऱ्याला बाहेर काढला आणि वेताळासारखा खांद्यावर टाकून तो अंजूच्या पाठोपाठ चालू लागला. एक छोटासा जिना चढून ती वर आली. आपल्या जवळच्या चावीनं तिनं दरवाजा उघडला आणि आत येऊन लाईट लावला.

त्या प्रशस्त घरामध्ये सर्व वैभव अंजूसमोर हात जोडून उभं असल्याचं पोपटला दिसलं. त्यानं तिथल्या एका गुबगुबीत सोफ्यावर तिच्या नवऱ्याला अलगद ठेवलं. त्याच्या गळ्यातील टाय सोडला, शूज् काढले आणि त्याला कुशीवर झोपवले. तोवर त्याच्या घोरण्याला एक सुखासीन लय प्राप्त झाली होती.

अंजू पोपटाच्या या सर्व कारवायांकडे निर्विकारपणे पाहत होती.

“मी निघतो अंजू.”

अंजू पोपटच्या अगदी जवळ आली. त्याच्यासमोर उभी राहून त्याच्या डोळ्यात खोल खोल पहात तिने हळूवारपणे विचारले.
“कुठे हरवलास रे? जुन्या सवयी गेल्या नाहीत अजून तुझ्या. चल गरम गरम कॉफी करते...” असं म्हणून अंजूनं ओढतच पोपटला आतल्या खोलीत नेलं.

आतमध्ये प्रशस्त बेडरूम, खोलीभर मऊ मुलायम नक्षीदार गालीचा. पराच्या गाद्या. मखमली उशा. उंच खिडक्यांना गडद उंची पडदे. वरती लखलखतं झुंबर. कोपऱ्यातला अँगल वापरून तयार केलेला छोटासा कंफरटेबल सोफा. समोर अर्धचंद्राकृती आकाराचा काचेचा टी-पॉय. त्यावर हस्तीदंती ॲश ट्रे. दुसऱ्या कोपऱ्यात एक शानदार ड्रेसिंग टेबल. नितळ बिलोरी उंच गोलाकार आरसा. त्याच्या शेजारी मध्यम आकाराच्या एका कुंडीत पुरूषभर उंचीचे रबराचे हिरवेगार झाड बेडच्या उशाशी एक अद्ययावत डेक. चारसहा वह्यां पुस्तकं. टेलीफोन. टेबललॅम्प.

पोपटने सहज म्हणून एक वही उचलली ती त्याच्या ओळखीची वाटली. त्याने पहिले पान उलटले.कॉलेजला असताना अंजू त्याला आपल्या नोट्स द्यायची. ही वहीसुद्धा त्यातलीच होती. पहिल्याच पानावर अंजूने सुविचार लिहिला होता. ‘इफ यू फेल, ट्राय अगेन बट नेव्हर फेल टू ट्राय’ त्याखाली कवितांच्या काही असंबद्ध ओळी. पोपटला वाटले ते अक्षर आपले असावे. त्या ओळीना अंडरलाईन मात्र त्याने केलेली नव्हती.
“अरे, तू अजून बसला नाहीस?”

पोपटचे हे सर्व निरीक्षण चालू असेपर्यंत अंजू वॉश घेऊन कपडे बदलून परत आली होती.
“मला जरा वॉश घ्यायचा होता.”
“हात्तिच्या, मग आधी नाही सांगायचं?”
असं म्हणून अंजूने त्याला अटॅचड् बाथरूमचा दरवाजा उघडून दिला. पोपटची बऱ्याच दिवसात आंधेळ झालेली नव्हती. वापरून फेकून दिलेल्या कपड्यासारखं त्याचं जगणं झालं होतं. बाथरूमच्या आरशात त्यानं स्वत:चा चेहेरा पाहिला. क्षणभर त्यानं स्वत:ला ओळखलंच नाही. ‘दर्पणी पहाता रूप न दिसे हो आपुले’ तो स्वत:शीच खदाखदा हसला. ज्ञानेश्वर किती द्रष्टे होते हे त्याला उमगलं!

पोपटने कपडे काढले आणि स्वत:चा नग्न देह आरशात न्यहाळला. स्वत:च्या अनोळखी देहयष्टीकडे पाहून तो क्षणभर अस्वस्थ झाला. ह्या अवस्थेत जर आपल्या बापाने आपल्याला पाहिले असते तर चाबकाने फोडून काढले असते, असा विचार त्याच्या मनात आला. बापाच्या आठवणीने पोपटचा थरकाप झाला.

***

त्याचा बाप पट्टीचा घोडेस्वार होता. दररोजच्या रपेटीसाठी त्याने एक घोडा बाळगला होता. वाऱ्यापेक्षाही वेगवान अशा त्या अबलख वारूच्या आसपासही जायला कोणी धजत नसे. एक दिवस मात्र घोटाळा झाला. पोपटचा बाप सकाळच्या रपेटीसाठी बाहेर पडत होता. त्याने घोड्यावर मांड ठोकली पण त्याच क्षणी घोडा उधळला आणि त्याने बापाला खाली फेकून दिले. बाप सैरभैर झाला. आयुष्यात पहिल्यांदाच तो

घोड्यावरून खाली पडला होता. अपमानाने तो शरमिंदा झाला. धावत जाऊन त्याने घोड्याचा लगाम पकडला. पोपटला हाक मारली आणि लगाम त्याच्या हातात देत म्हणाला,

“हा लगाम! आजपासून हा घोडा तुला दिला. त्याला संभाळ. जीव लाव. तू आता मोठा झालास. मी म्हातारा झालो...”

असे म्हणून बापाने पोपटला घोड्यावर चढवले. पोपटने भक्कम मांड ठोकली आणि घोडा वाऱ्याच्या वेगाने निघाला. पोपट जेव्हा एक फेरी मारून परत आला तेव्हा स्वत:च्या मांडीत स्वत:च्या बंदुकीची गोळी झाडून गतप्राण झालेल्या बापाचे दर्शन त्याला झाले. बापाचे अवतार कार्य संपले होते.

***

पोपटने आपल्या शरमिंद्या झालेल्या चेहेऱ्यावर थंड पाण्याचा शॉवर सोडला. त्याची दाढी अस्ताव्यस्त वाढली होती. डोक्यावर केसांचे जंगल झाले होते. अंगावर धुळीचे थर बसून पुटं चढली होती. गार पाणी अंगावर पडताच त्याला खूप बरं वाटलं. मनसोक्तपणे आंघोळ केल्यावर त्याने दांडीवर पाहिलं. तिथे अंजूच्या नवऱ्याचा गाऊन पडला होता. तो अंगावर घालून पोपट बाहेर आला. अंजूने त्याच्याकडे पाहिजे त्या भल्यामोठ्या गाऊनमध्ये पोपट असा काही दिसत होती की जणू भल्यामोठ्या टरफलातले इवलेसे बी!

अंजू मनोमन सुखावली. तिने टी पॉयवर गरमागरम टोस्ट बटर, वाफाळते ऑम्लेट आणि कॉफीची किटली रेडी ठेवली होती. पोपट त्या गुबगुबीत सोफ्यावर बसला. त्याला आता कमालीची भूक लागली होती. समोरच्या  पदार्थांवर तो मनसोक्तपणे तुटून पडला. अंजू कॉफीचा एकेक घोट घेत शांतपणे त्याच्याकडे पाहत होती. खाणं-पिणं संपल्यावर पोपटला खूपच छान, झकास, मस्त, उबदार वाटलं. तो उठला आणि खिडकीशी जाऊन उभा राहिला. त्याने पडदा दूर सारला.बाहेर खच्चून चांदण पडलं होतं. चांदणं पाहून तो सुखावला. इतकं चांदणं पडलं होतं की जणू आभाळाच्या कढईला सोन्याची कल्हई केली होती !

“इतकी वर्ष कुठं होतास?”
त्याच्या शेजारी उभे राहत अंजूने विचारले.
पोपटने एक ढेकर दिला.

“ तू लग्न का केलं नाहीस?”
अंजूने त्याल परत विचारले.

पोपटने करंगळी कानात घातली आणि जोरजोरात हलवली. त्याच्या कानात अडकलेला पाण्याचा एक उष्ण थेंब बाहेर आला. आता त्याला खूपच छान वाटले.
“मध्यंतरी तू जीवघेण्या दुखण्यातून वाचलास.”
“कसल्या ?” पोपटने तोंड उघडले.
“तुला गनोरिया झाला होता.”
“टॉलस्टॉयला सिफिलस झाला होता.” पोपटची प्रतिक्रिया!
“तू टॉलस्टॉय नाहीस.”
“त्याअर्थी टॉलस्टॉयला गनोरिया झाला नव्हता!”-

पोपट सात मजली हसला. त्याचे सर्व निष्कर्ष असेच अनपेक्षित व धक्कादायक असत. त्यामुळे अंजू त्याच्याशी वाद घालण्याच्या फंदात पडत नसे. तिने विषय बदलला.

“तुझ्याविषयी सर्व माहिती मिळते मला”
“तुला तिची काय गरज ?”
“लहानपणापासून एकत्र वाढलो आपण...”
“भूतकाळाचं मढं कशाला उकरतेस?”
“आपला भूतकाळ फार सुंदर होता.”
“पण माझ्या आयुष्याला कुरूप भूतकाळाची वाळवी लागली. तिनं माझा वर्तमान पोखरून काढला...”

भूतकाळाच्या यातनानी पोपटचा चेहेरा पिकासोच्या चित्रातील चेहेऱ्यासारखा वेडावाकडा झाला. क्षितीजापाशी एक झळझळीत उल्का कोसळली.

अंजूने खिडकीवरचा पडदा ओढत म्हटले,

“पोपट, तू झोप आता, तुला विश्रांतीची गरज आहे...”

तिने मंद उजेडाचा रात्रीचा दिवा लावला. पोपट स्वप्नात चालत असल्यासारखा निमूटपणे बिछान्याकडे आला आणि एक मुलायम शाल अंगावर ओढत आडवा झाला.

अंजू आरशासमोर जाऊन उभी राहिली. क्षणभर मान कलती करून तिने आपले रूप न्यहाळले. आपण अजूनही सुंदर दिसतो, मादक दिसतो ह्या जाणिवेमुळे तिचा चेहरा गर्वोन्नत झाला. हळूवारपणे तिने आपले केस मोकळे सोडले. तिचा काळाशार केशकलाप नितंबांपर्यंत कोसळला. मानेला एक हलकासा झोका देऊन तिने सर्व केस पुढच्या बाजूला आणले. त्यानंतर तिने हळूवारपणे साडी सोडली. क्रमाक्रमाने एकेक अंतर्वस्त्र काढले.

आता ती पूर्णपणे नग्न आणि धगधगत्या ज्वाळेसारखी चैतन्यशाली दिसत होती. तिचे स्तन तिच्या देहातून जणू उसळून बाहेर पडत होते. तिच्या एका स्तनावर तिच्या केसांचे आवरण होते तर दुसरा विवृत होता. ड्रेसिंग टेबलमधून कंगवा काढण्यासाठी ती जेव्हा खाली झुकली तेव्हा तिच्या त्या स्तनातून एक कबुतर बाहेर डोकावतेय असे पोपटला वाटते. स्तनाला कबुतराची उपमा देणाऱ्या कवीविषयी पोपटचा ऊर अभिमानाने भरून आला. ती जेव्हा खाली झुकली तेव्हा तिच्या स्तनाचे टोक कबुतराच्या मानेसारखे वेळावले गेले होते. त्याच्या खाली निळसर तांबूस छटेचे एक अर्धवर्तुळ आणि त्याच्याही पलिकडे स्तनाचा विस्तारत गेलेला पिसारा. तिच्या स्तनातून कबूतर होऊन उडून जावे असे क्षणभर पोपटला वाटले.

अंजूने आरशाकडे पाठ केली आणि मान वळवून स्वत:चा पार्श्वभाग न्याहाळला. कमरेवर आलेली चरबीची एक छोटीशी वळकटी सोडता तिचा संपूर्ण देह पूर्वीसारखाच नितळ आणि कमनीय होता. स्वत:च्याच ह्या लोभस दर्शनाने ती कमालीची सुखावली आणि पोपटजवळ आली.

“पोपट...”
पोपटचा डोळा लागला होता.
“पोपट... पोपट...”
तिने पोपटला हलवले.
“काय?”
“मी कशी दिसते?”

“सात समुद्र खारे आणि सात समुद्र गोडे ओलांडून पलिकडे गेलं की तिथं चंद्रकला राणीचा महाल लागतो. चंद्राला म्हणते उगवू नको आणि सूर्याला म्हणते मावळू नको असं तिचं लावण्य आहे. त्या राणीच्या डाव्या पायाच्या आंगठ्यावर जे तेज आहे ते तुझ्या तोंडावर नाही.” असं म्हणून पोपट पुन्हा झोपी गेला.

“पोपट पोपट बोलतोस गोड
पण झालास रोड
खा ना जरा पेरूची फोड...”

पोपट उठला. त्याने बिछान्याखालून एक नंगी तलवार काढली आणि ती दोघांच्या मधोमध ठेवून शांतपणे झोपी गेला...

***

पोपटला झोपेत स्वप्नं फार पडायची. स्वप्नात अधून-मधून त्याची लंगोटी ओली व्हायची. स्वप्नं खोटी असतात यावर त्याचा विश्वास बसायचा नाही. कारण स्वप्नं जर खोटी असती तर लंगोट्या ओल्या का झाल्या असत्या?

पोपटच्या स्वप्नातील पहिला शॉट स्लो मोशनने सुरू झाला...

संध्याकाळ. अथांग निळा समुद्र. निरभ्र आकाश. चंद्रकोरीसारखा आंतर्वक्र आणि टोकाशी समुद्रात घुसलेला किनारा. लांबवर काही नारळाची झाडं आणि गगनचुंबी इमारती.

पोपटची नजर आभाळात गेली. एका बाजूने बगळ्यांची लांबलचक माळ झपाझप उडत येत होती.

आभाळात कळपाने उडणारे पक्षी मोजण्याची पोपटला लहानपणापासून सवय होती. एक... दोन... तीन... आठ... अकरा... पंधरा... बीस... सत्तावीस. सत्तावीस बगळे होते ते...

“हे घे!”

अंजूच्या आवाजाने तो भानावर आला. तिच्या हातात. गुलाबाच्या फुलांचा एक गुच्छ होता.
“हे कशाबद्दल?”
“अरे आज तुझा सत्ताविसावा वाढदिवस ना? म्हणून तुझ्यासाठी हा सत्तावीस फुलांचा गुच्छ आणलाय.’
“तुला हे नाही ते धंदे करायला कुणी सांगितलंय?”
आपल्याविषयी कुणी अनावश्यक सलगी दाखवली की पोपट संतापायचा. त्याच्या संतापण्यामुळं अंजू नर्व्हस झाली.
“तुला माहीत आहे ना की असले उपचार मला आवडत नाहीत म्हणून?”

ती रडू लागली. अखेर पोपटने तिच्या हातातील गुच्छ आपल्या दोन्ही हातानी हातात घेतला तेव्हा तिचे हातही त्याच्या हातात आले...

अंजू होळीच्या दिवशी त्याच्यासाठी पुरपणपोळीचा डबा आणायची. संक्रांतीला तिळाच्या वड्या आणायची. तिने एकदा त्याचा पांढरा शर्ट धुवून नीळ घालून इस्त्री करून आणला होता. ती अशी एक गृहिणी होती की जी पोपटचे आयुष्य धुवून, नीळ घालून दोरीवर वाळत टाकायला निघाली होती...

प्रत्येक वाढदिवसाला पोपट समुद्रकिनारी येऊन बसायचा. हे ठिकाण अंजूशिवाय दुसरं कुणालाच माहीत नव्हतं. अंजू कोळीवाड्यात राहयची त्यामुळे संपूर्ण समुद्रकिनारा तिला तोंडपाठ होता. तिनेच हे निवांत ठिकाण पोपटला आपोआप त्या ठिकाणाकडं वळली होती. यावेळी अंजू येणार नाही. हॉस्पिटलमध्ये झालेली तिची आणि आपली शेवटची भेट अशी पोपटची खात्री होती. पण तरीही अंजू आली आणि या क्षणी तिचे हाज पोपटच्या हातात होते.

"प्लीज हात सोड..."
असे म्हणून झट्कन अंजूने आपले हात पोपटच्या हातातून सोडवून घेतले.
"का?"
"मी फक्त तुला शुभेच्छा द्यायला आले होते. माझं लग्न ठरलंय!"

पोपट चमकला. शरमिंदा झाला. अंगावर चढणाऱ्या एखाद्या किळसवाण्या किटकाला झटकावे तसा तिने पोपटला झटकून टाकले होते. पोपट त्या क्षणाच्या धारदार पात्यावर तोल सांभाळत उभा राहिला. त्याच्या पायातून रक्त बाहेर पडू लागले! तोवर अंजू उठली फर्लांगभर अंतर मध्ये ठेवून तिने दोन ट्रायपॉड लावले. त्यावर तिने एक दोर बांधला. त्यानंतर तिने एक बांबू आणला आणि पोपटच्या हातात देऊन त्याला म्हणाली,

"ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत जा!"

हातात बांबू घेऊन पोपट त्या दोरावर उभा राहिला आणि त्याने एक पाऊल उचलले...

अंजू म्हणजे एक धुकं होतं
त्या धुक्यात पोपटनं
रत्नजडित महाल बांधला
महालात प्रतिसृष्टी निर्माण केली.
प्रवेशद्वाराशी मोत्याची कमान बांधली
कमानीसमोर अखंडपणे थुयथुयणारा
कारंजा उभारला.
त्यातून प्रकाशकिरण पार झाले की
महालावर इंद्रधनुष्य पडायचं
पोपटच्या जीवाचं फुलपाखरू
त्या इंद्रधनुष्यावर बसायचं
आणि गाणं गायचं–

पोपट क्षणार्धात खाली कोसळला. त्याचं अंग चेचून निघालं तोंडातून रक्त यायला लागलं असहाय वेदनानी तो तळमळू लागला. दूरवर मासेमारी करणारे काही कोळी धावत आले. त्यांना वाटलं हा डोंबारी आहे. त्यांनी टाळ्या वाजवल्या. तोवर पोपटची हालचाल मंदावत आली होती. तरीही त्याने आपला तिरळा डोळा किलकिला करून पाहिले; गुलाबाच्या सत्तावीस फुलांच्या पाकळ्या इतस्तत: विखुरलेल्या होत्या. हळूहळू तो उठला आणि लांब दांडीचा एक उलटा झाडू घेऊन त्याने त्या पाकळ्या एकत्र करायला सुरूवात केली. दुसऱ्या बाजूने 'मेरा नाम जोकर' मधील राज कपूर आपली हातगाडी ढकलीत पुढे आला. हातगाडीत त्याच्या हृदयाचे तुकडे भरलेले होते. गुलाबाच्या पाकळ्या पोपटने त्याच हातगाडीत भरल्या आणि तो राजकपूरबरोबर सूर्यास्ताच्या दिशेने कॅमेऱ्याकडे पाठ करून चालू लागला...

'कल खेल मे हम हो ना हो
गर्दिशमे तारे रहेंगे सदा...'

मावळत्या सूर्याचे किरण  त्या दोघांच्या ढेंगाखालून येत होते...

***

अंजूचा पाय पोपटच्या पायावर पडल्यामुळे त्याला पट्कन जाग आली तो उठून बसला. त्याने 'टॉप ॲन्गल'ने अंजूकडे पाहिले. ती अस्ताव्यस्त झोपली होती. तिचे लांबसडक रेशमी केस तिच्या नग्न देहावर काळ्या ऑक्टोपससारखे पसरले होते. मंद निळसर प्रकाशात तिचा तो देह संगमरवरात घातक छिनीने कोरलेल्या शिल्पासारखा दिसत होता.

पोपटच्या मनात आले की अंजूला अशी अवघडलेल्या स्थितीत झोपू देण्याऐवजी एका कुशीवर झोपवून द्यावे. म्हणून तो पुढे झुकला. अंजूचा चेहेरा अगदी निरागस आणि निरामय दिसत होता. एखाद्या अल्लड आणि अनाघ्रात पुष्पासारखी ती दिसत होती. एखाद्या लहान बालकाला कुशी करावे तसे पोपटने अंजूला कुशी केले. त्या क्षणी अंजूच्या एका स्तनाचा ओझरता स्पर्श पोपटच्या हाताला झाला. त्या स्पर्शाने, पोपटने आपल्या मनाच्या अंधाऱ्या तळघरात कोंडून ठेवलेला भूतकाळ धुक्यासारखा वितळून गेला.

***

पोपटचा चेहरा मावळणाऱ्या सूर्यावर डिझॉल्व होतो आहे. सूर्याची शेष किरणं समुद्राच्या पाण्यावरून परावर्तीत होत आहेत. लाटांचा चुबुक् चुबुक् असा आवाज येत आहे. दंतुर किनाऱ्यावर सर्वत्र फेस पासरलेला आहे. एक मोठी लाट कॅमेऱ्यावरच धाऊन येते. लाटेबरोबर फेसही लेन्सवर पसरतो.

लाँगशॉट.

दूरवर अर्धी पाण्यात असलेली होडी कॅमेरा चित्रित करतो व मंद गतीने होडीकडे सरकतो. मिड क्लोजप्. होडीच्या सुकाणूवर एक पक्षी बसलेला असतो. तो उंच उडतो. कॅमेरा त्याचा पाठलाग करतो. पक्षी आता खालच्या दिशेने उतरतोय. त्या पाठोपाठ कॅमेराही खाली येतो. पक्षी होडीच्या सुकाणूवर बसतो. आता कॅमेरा पक्ष्याच्या पाठीवरून होडीच्या आतील भाग चित्रित करतो. होडीत अंजू आणि पोपट.

त्यांच्यातील व्याकुळ, धूसर, आवेगी संवाद :

"संध्याकाळच्या समुद्राची गाज माणसावर चेटूक करते..."

"ही गाज शब्दात पकडता आली असती तर किती बरं झालं असतं?"

"ही गाज म्हणजे समुद्राचे नि:श्वास"

"हाताच्या अंतरावर धरणी बाहू फैलावून उभी आहे पण–"

पोपटने अंजूचा हात प्रथमच हातात घेतला. त्याच्या हाताना कंप सुटला होता. अंजूने त्याच्याकडे पाहिजे. त्याच्या तिरळ्या डोळ्यातली एक रक्तवाहिनी विद्युतपुरवठा चालू झाल्यासारखी लाल व्हायला लागली होती. त्याला काहीतरी बोलायचं होतं पण त्याचा घसा सुकला होता. ओठ कोरडे पडले होते. त्याने आवेगाने अंजूच्या हाताचे चुंबन घेतले. तिच्या अंगावर शहाऱ्याची एक लाट उमटली. तिच्या हातावरची लव क्रमाक्रमाने पण सुसाट गतीने उभी रहात गेली. पोपटच्या हात तिच्या खांद्यांच्या दिशेने सरकत गेला. तिच्या मानेवरून तो जेव्हा तिच्या स्तनावर उतरला तेव्हा ती माशासारखी तळमळत पोपटचा मिठीत शिरली. तिचा उष्ण ओलसर श्वास त्याच्या मानेवर, खांद्यावर, छातीवर, कानाच्या पाळीखाली उत्तेजक स्प्रेसारखा पसरत राहिला.

अंजूच्या केसातील बकुळीच्या फुलांचा, तिच्या घामाचा, समुद्राच्या खाऱ्या हवेचा दर्प पोपट श्वासात भरून घेत होता. पोपटचा हात तिच्या मांडीवर आला तेव्हा ती नखशिखांत थरथरत होती. तिच्या आवेगाच्या

लाटेमागून लाटा येत होत्या आणि त्याच्या आवेगात विरून जात होत्या. पोपटाच्या शरीरात धरणीकंपासारखी उलथापालथ होत होती. मनाच्या तळाशी सुप्तावस्थेत पडून राहिलेलं एक जग उसळून वर येत पुन्हा लुप्त होत होतं. त्या विस्मयकारक जगाच्या सहवासासाठी पोपट अंजूच्या उघड्या, विदग्ध-धरणीमय मांड्यांत स्वत:ला पुन:पुन्हा गाडून घेत होता... अंजूच्या देहाच्या ढिगाऱ्यात तिच्या पिढ्यान् पिढ्याच्या संस्कारांचे अवशेष इतस्तत: विखूरलेले होते. त्यांच्या कणाकणावर पोपट चांदण्यासारखा पसरत गेला...

अंजूने डोळे उघडले–

वर मोकळं आकाश. लुकलुकणाऱ्या चांदण्या. खाली झुलणारी होडी. सभोवार अथांग समुद्र...

खूप रात्र झाली होती
खूप चांदणं पडलं होतं
आणि खूप भरती येऊन
त्यांची होडी खूप खोलवर
समुद्रात हेलकावत चालली होती...

***

दूरवर पाचचे ठोके पडले. पोपट उठला. विचार कर-करून त्याला खूप शीण आला होता. पण त्याची झोपही आता उडाली होती. तो उठून आरशासमोर आला. आपल्या अंगावर अंजूच्या नवऱ्याचा गाऊन आहे हे त्याला दिसलं. त्याला त्या गाऊनची किळस आली. त्याने गाऊन काढून फेकून दिला.

आरशात स्वत:च्या नागड्या रूपाकडे पाहिल्यानंतर त्याला जरा बरं वाटलं. त्याच्या मनात आलं, अंगावरचा कपडा फेकल्यानंतर जितक्या सहजपणे आपण आपल्या नागड्या देहाचे दर्शन घेऊ शकतो तितक्या सहजपणे जर अंतिम सत्याकडे जाता आले असते तर किती बरं झालं असतं! त्याने आरशात स्वत:च्याच चेहेऱ्याकडे रोखून पाहिले आणि स्वत:शीच संवाद सुरू केला.

“हॅलो पोपट...”
“हॅलो...”
“माझ्याशी बोलशील ?”
“मी तुझा बांधील नाही.”
“पण तू माझ्या देहात राहतोस.”
“तुझा देह मृतवत् आहे.”
“मग मृतवत् देहात तू का राहतोस?”
“कारण सत्य हे मृत्यूच्या सान्निध असतं”
“तू सत्याचा शोध घेतोहेस?”
“अर्थातच.”
“सत्य दिसलंय तुला?”
“ऐंशी टक्के दिसलेलं नाही.”
“वीस टक्के कसं असतं?”
“ते कंचुकीतल्या स्तनासारखं किंवा ओल्या लंगोटीसारखं नसतं. अंजूच्या नवऱ्याचा गाऊन किंवा अंजूचं गर्भाशय याच्याशी काहीही संसबंध नसतो.”
“का?”

“सत्य हे न्हाणीघरातून गटारात गटारातून नदीत आणि नदीतून समुद्रात वहात जातं. तिथं त्याची वाफ होते आणि आभाळात जाते. नंतर ते ढगातून धरणीवर ठिबकतं आणि मातीत रूजून फुलाच्या पाकळीतून भुंग्याच्या पायाला चिकटून मनात येईल तिकडे भटकत राहतं...”

“पोपट?”
अंजूच्या हाकेमुळे पोपट सावध झाला. अंजू जागी होऊन बेडवर बसली होती.

“अजून झोपला नाहीस तू?”

पोपटच्या लक्षात आलं की आपल्या अंगावर कपडे नाहीत. तो चट्कन बाथरूममध्ये गेला. कपडे घातले. बाहेर आला आणि पुन्हा खिडकीजवळ उभा राहिला. बाहेर पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला होता.अंजू त्याच्या बाजूला येऊन उभी राहिली.

“एवढा कसला विचार करतोहेस?”
अंजूच्या प्रश्नाला पोपटने काहीच उत्तर दिले नाही तेव्हा तिने म्हटले,
“कॉलेजच्या खिडकीतून दिसणाऱ्या नारळाच्या झाडाला पहिल्यांदा फुलं आली तेव्हा तू कविता लिहिली होती. आठवतेय?”
“नाही.”
“कम्युनिकेशन-स्कीलविषयी मला समजावून सांगताना तुझी बोटे माझ्या मांडीवरून फिरत होती ते आठवतंय?”
‘कम्युनिकेशन हे कम्युनिकेशन असतं’ असं म्हणत पोपट मोठ्यानं हसला!’
“माझ्या हातावर नायटा उठला होता तेव्हा तू मला औषधाची डबी आणून दिलीस ते आठवतंय?”
“नाही!”
“समुद्रकिनारी आपण पहिल्यांदा भेटलो त्यानंतर दुसऱ्या दिवशी आंघोळ करताना तुला तुझ्या शरीराची नव्यानं ओळख झाली होती ते आठवतंय?’
“नाही!”
“रेल्वे स्टेशनवर गर्दीत संध्याकाळी मी तुझा हात हातात घेऊन रडले ते आठवतंय?”
“नाही!”
“एका वृत्तपत्राच्या इमारतीसमोर घाऱ्या डोळ्याच्या एका बाईच्या गाडीखाली मरता मरता वाचलास ते आठवतंय?”
“नाही!”
“माझं गाणं सोडून गॅदरिंगमधून तू मधूनच उठून चालता झाला होतास ते आठवतंय?”
“नाही!”
“प्रॉम्प्टिंग करता करता विंगेच्या आड माझ्या स्तनांच्या स्पर्शान तू कासावीस झाला होतास ते आठवतंय ?”
“नाही!”
“मग ती रंगपंचमी?”
“नाही!”
“पहाटेचं फिरणं?”
“नाही!”
“सोबतीनं पाहिलेले चार्लीचे चित्रपट?”
“नाही!”
“पोळीचा कुस्करा?”
“नाही!”
“मुलीला घेऊन आलेल्या बाईचं स्वप्न?”

“नाही!”
“अज्ञानाचे गहिरे रंग?”
“नाही!”
“तू माझा हात मागीतला होतास ते?”

“नाही.. नाही.. नाही...”

***

पोपटने सहज पँटच्या डाव्या खिशात हात घातला. खिशातली मूठ त्याने बाहेर काढली आणि उघडली. त्याला आश्चर्य वाटले कारण त्याच्या तळहातावर मूठभर वाळू हाते. अंजूला घेऊन तो पहिल्यांदा समुद्रावर गेला होता; त्याच्या दुसऱ्या दिवशीसुद्धा त्याला आपल्या खिशात अशीच वाळू सापडली होती...

पोपटने हळूहळू मुठीतली वाळू खाली सोडली. कशालाच काहीही अर्थ नव्हता. कुठंतरी जीव जडवणं किंवा कुणापासूनतरी अलिप्त राहण्याचा प्रयत्न करणं मूर्खपणाचं होतं. जणू त्याच्या सर्व हालचाली एका प्रचंड कारस्थानानं नियंत्रित केलेल्या होत्या. त्याचे विचारसुद्धा नियंत्रित करण्यात आलेले होते. त्याचा जन्मसुद्धा त्याची परवानगी न घेता झाला होता.

आणि मृत्यू?

पोपटने विचार केला मृत्यूतरी पूर्णपणे आपल्या हातात आहे का? समजा आपण ह्या क्षणी आत्महत्या केली तर? किंवा समजा या क्षणी आपण दीर्घ पल्ल्याच्या आयुष्याचे मनसुबे रचले तर? किंवा या दोन समजांच्या मधल्या अंतरावर पावसाच्या थेंबासारखं लोंबकळत राहिलं तर?

एकाएकी पोपटला घोड्याच्या खिंकाळण्याचा आवाज आला. कितीतरी दिवसापासून अंतराय निर्माण झालेला त्याचा लाडका घोडा खिंकाळत खाली उभा होता. क्षणाचाही विचार न करता पोपटने खिडकीतून खाली उडी मारली– द एण्ड!

कदाचित पोपटने मुद्दाम चुकीच्या दिशेने उडी मारली असेल. कदाचित अंजूने त्याला वरून ढकलून दिले असेल. कदाचित घोड्याने त्याला आपल्या पाठीवरून भिरकावून दिले असेल.

पोपट मेला असल्यास त्याच्या अनेक शक्यता आहेत...

त्यातली एक अंजू !

***